# शिवाजी विद्यापीठ विविध उपक्रमांमध्ये अग्रेसर

## शिवोत्सवाने विद्यापीठाचे नाव देशपातळीवर; 'जलयुक्त'द्वारे जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या २०१६-१७ च्या शैक्षणिक वर्षाचा समारोप होत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या दृष्टीने हे वर्ष अविस्मरणीय ठरेल ते विद्यापीठाने राबविलेल्या विविधांगी उपक्रमांमुळे. त्यामध्ये 'जलयुक्त विद्यापीठ' अभियान, राष्ट्रीय युवा महोत्सवाचे यशस्वी आयोजन आणि 'ग्यान' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेले कोर्सेस अशा अनेक उपक्रमांतून विद्यापीठाने आपले वेगळपण जपले आहे.



देशातील अग्रणी विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक आहे. गेल्या वर्षभरात शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याबरोबरच विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. विद्यापीठाने शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच राबविलेल्या इतर उपक्रमांमुळे गत वर्षी पडलेल्या दुष्काळातून धडा घेऊन तसेच विद्यापीठ म्हणून पाण्याच्या बाबतीत लोकांनी काही प्रेरणादायी काम करावे यासाठी शिवाजी विद्यापीठाने 'जलयुक्त विद्यापीठ' हा उपक्रम हाती घेतला. त्याद्वारे विद्यापीठातील जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले तर काही स्त्रोत नव्याने निर्माण करण्यात आले. त्यामुळे विद्यापीठ पाण्याच्या दृष्टीने समृद्ध तर झालेच त्याच बरोबर विद्यापीठाचा पाण्यावर होणारा खर्च ही वाचला. केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयातर्फे राबविण्यात आलेल्या 'ग्यान' या उपक्रमात शिवाजी विद्यापीठाने आपला ठसा उमटविला. विद्यापीठास आयआयटी, आयआयएम अशा नामांकित शैक्षणिक संस्थांच्या बरोबरीने हे प्रकल्प मिळाले. त्यामध्ये जगाच्या कानाकोपऱ्यातून सात आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधक, शिक्षकांनी शिवाजी विद्यापीठात येऊन येथील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. यामध्ये डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांनी मेकॅट्रॉनिक्ससारख्या प्रगत विषयावर सात दिवस विद्यापीठात राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर एआयटी थायलंड येथील डॉ. पर्चीकुन, 'अठराव्या शतकातील दख्खन' या मराठा इतिहासासंबंधीच्या विषयावर, मिशीगन येथील प्रा. गॉर्डन, हिंदी ही आपली राष्ट्रभाषा परदेशात कशी शिकवावी आदींबाबत केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या कायम लक्षात राहाण्यासारखे होते. विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये इस्त्रोच्या 'आयएनआरएसएस' उपग्रह मालिकेतील संदेशग्रहण करणारा रिसिव्हर बसविण्यात आला. अशी सुविधा उपलब्ध असणारे आणि या उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळालेले शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव अकृषी विद्यापीठ आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीदिनी एकाच दिवशी व एकाचवेळी आणि एकाच विषयावर १२५ ठिकाणी विद्यापीठाने व्याख्यानांचे आयोजन केले होते.

राष्ट्रीय युनिव्हर्सिटी असोसिएशन आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ५३ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे यजमानपद शिवाजी विद्यापीठास मिळाले. यामध्ये देशभारातील ८१ विद्यापीठाच्या १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यापीठाने

'शिवोत्सव' असे नाव या महोत्सवास देत त्याचे यशस्वी आयोजन केले. त्याचबरोबर विद्यापीठाने राबविलेले 'बेटी बचाव' अभियान तसेच मतदार जागृती अभियान आणि कॅशलेस व्यवहारांसाठी व पेपरलेस कामकाजासाठी केलेले प्रयत्न लक्षवेधी ठरले.

### सर्वांगीण ज्ञान हाच उद्देश



विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याबरोबर इतर उपक्रमांमधून त्यांना सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांतील सामाजिक भान जागृत करण्याचा प्रयत्न विद्यापीठाने केला. फक्त पुस्तकी ज्ञानात विद्यार्थ्यांनी अडकून पडण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख कार्य करण्यासाठी हे उपक्रम महत्त्वाचे ठरतील.

- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

6 MAR 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# स्वप्ने मोठी असणे आवश्यक

## रावसाहेब पाटील यांचे प्रतिपादन, शिवाजी विद्यापीठात नेतृत्व कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

वेळेचे महत्त्व, स्वप्नाची दुनिया, आयुष्याचे पुस्तक आपण वाचायला हवे. स्वत:च्या नजरेत स्वप्ने मोठी असली पाहिजेत, असे प्रतिपादन दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी केले.

दक्षिण भारत जैन सभा व महावीर अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठातील भाषा भवन मध्ये आयोजित नेतृत्व कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी प्रशांत पितालिया, प्रा. डी. ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले. अनुराधा गायकवाड यांनी 'महिला व नेतृत्त्व गुणांचा विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. राजेंद्र पारिजात यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास समाज आणि निर्णय क्षमता' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांनी 'बदलती परिस्थिती आणि कार्यकर्त्यांची जडणघडण' या विषयावर मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : नेतृत्व कार्यशाळेत बोलताना रावसाहेब पाटील,**

समारोपाच्या सत्रात डॉ. बी. एम. हिर्डेकर, अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. सुरेश रोटे यांनी प्रास्ताविक केले. पार्श्वनाथ पाटील, संजय पाटील, सुकुमार बेळके यांनी परिचय करून दिला. प्रिया खोले व राजकुमार चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. पद्मजा पाटील यांनी आभारमानले. कार्यशाळेसाठी विजयकुमार शेट्टी, अरविंद मजलेकर, शशिकांत राजोबा, वीर सेवा दल वीर महिला मंडळ, महिला परिषद यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

6 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**रावसाहेब पाटील :** शिवाजी विद्यापीठात नेतृत्व कार्यशाळेचे उद्घाटन; पद्मजा पाटील व नेमिनाथ शास्त्री यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

# नेतृत्व गुणाला योग्य दिशा दिल्यास परिवर्तन शक्य

कोल्हापूर : शिक्षणातूनच परिवर्तन शक्य आहे. नेतृत्व गुण जन्मजातच असतात. त्याला योग्य दिशा दिल्यास समाजपरिवर्तन होऊ शकते, असे प्रतिपादन दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब आ. पाटील यांनी रविवारी येथे केले.

येथील दक्षिण भारत जैन सभेच्या डॉ. विलास संगवे अकादमी आणि शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनातर्फे आयोजित नेतृत्व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात कार्यक्रमास लेखक प्रशांत पितालिया, डॉ. अनुराधा गायकवाड, राजेंद्र पारिजात, डॉ. सुनीलकुमार लवटे, बी. एम. हिर्डेकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ जे. एफ. पाटील यांनी मार्गदर्शन केले.



शिवाजी विद्यापीठात रविवारी भगवान महावीर अध्यासन केंद्र व दक्षिण भारत जैन सभेतर्फे आयोजित नेतृत्व कार्यशाळेत दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी संजय शेटे, डॉ. अजित पाटील, पद्मजा पाटील, प्रशांत पितालिया, प्रा. डी. ए. पाटील, आदी उपस्थित होते.

लेखक पितालिया म्हणाले, स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी कष्ट करायला हवे. प्रत्येकाचे स्वप्न वेगळे असते. स्वप्नांचा अर्थ कळायला हवा.

डॉ. गायकवाड म्हणाल्या, महिलांनी नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी आपल्या कौशल्यांचा विचार करावा. त्यांनी समाज विकासासाठी काम करावे. नेतृत्वातून त्यांनी काम केल्यास समाजात निश्चितच परिवर्तन होईल.

डॉ. परिजात म्हणाले, व्यक्तिमत्त्व विकासातून समाजात चांगल्या गोष्टी देता येतात. यासाठी समाजात काम करताना आपल्याकडे निर्णय घेण्याची क्षमता असायला हवी.

## कौशल्य असायला हवे

नेतृत्व करताना आपल्याकडे कौशल्य असायला हवे. समाजाला जाणणारी व्यक्तीच नेतृत्व करते. आपल्या ठिकाणी कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची क्षमता असावी, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, समाजाचे नेतृत्व करताना संयम फार गरजेचा आहे. कार्यकर्ता हा समाजाचा आरसा असून त्याला निर्माण करताना काळजी घेतली पाहिजे. कार्यकर्ता शिस्तबद्ध, नि:स्वार्थी, संवेदनशील, क्रियाशील असावा.

डॉ. लवटे म्हणाले, आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये कार्यकर्त्यांनी काम करताना आपली जडणघडण व्यवस्थित केले पाहिजे. कार्यकर्ते शांत संयमी, ज्ञानसंपन्न, उत्साही असावा.

कार्यक्रमात डॉ. पद्मजा पाटील व नेमिनाथ शास्त्रीलिखित पुस्तकांचे प्रकाशन रावसाहेब पाटील व प्रमुख उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रा. डी. ए. पाटील, सागर चौगुले, डॉ. अजित पाटील, संजय शेटे, विजयकुमार शेट्टी, अरविंद मजलेकर, शशिकांत राजोबा, आदींसह वीर सेवा दल, वीर महिला मंडळ, महिला परिषदेच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

कार्यशाळेचे समन्वयक सुरेश रोटे यांनी प्रास्ताविक केले. पार्श्वनाथ पाटील, संजय पाटील, सुकुमार बेळके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. सुप्रिया खोले, राजकुमार चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. पद्मजा पाटील यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

Times of India
6 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity to celebrate Women's Day in a unique manner

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The foreign language department of the Shivaji University, Kolhapur (SUK) is organising a three-day film festival starting from March 7 at Bhasha Bhavan at SUK campus.

CAMPUS BUZZ

The festival has been organised to celebrate the occasion of women's day. The three-day film festival has been specially curated by a veteran film director and actor, Amul Palekar and Sandhya Gokhale.

An SUK official said, "The festival will be inaugurated with the film Mirch Masala on Tuesday, Moolaade(magical protection) which a French movie will be screened on Wednesday. On the concluding day, the film Aquarius will be screened.

According to SUK officials, the films that have been selected talks about women resistance movement and also highlight the adversities they face in the adverse situations. An interaction session have also been organised after each film screenings where students can ask questions and express opinions about the film.




TOI

The three-day film festival has been curated by a film director and actor Amul Palekar and Sandhya Gokhale

**Sharad Institute students selected by Essar:** The students of Sharad Institute of Technology and College of Engineering located in Yadrav which is 30km away from the city have been placed in good multinational companies this year. Of all the students, 34 of them have been selected in Essar multinational. These students have been assigned to work in the field of energy, retail, auto and manufacturing.

**DKTE students invited to Germany:** In the annual get-together event 'Swayam-2017' at DKTE Society Textile and Engineering Institute, Wolfgang Schrott, professor at Hof University of applied science invited DKTE students for an exchange programme in Germany. The event conducted on March 4 where hundreds of students gathered for the function.

**Guidance lecture for students at SUK:** The pre-service centre of the Shivaji University, Kolhapur (SUK) had organised a guidance lecture for the students preparing for the competitive exams on March 2 at the SUK campus. Former director of Sericulture department Laxmikant Kalantri, and Rangnath Naikade, deputy conservator of forests were also present at the event.

Times of India
6 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK seeks data of CHB and eligible candidates

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has sought the data of clock-hour basis (CHB) teachers and eligible candidates from the respective fields and division to add into its database.

Controller of examinations (CoE), SUK, Mahesh Kakade, told **TOI** that according to the new Maharashtra Universities Act, 2016, universities can take assistance of the CHB teachers in exam related chores. These teachers must have at least three years of work experience in respective subjects or field. Therefore, we have asked the colleges affiliated to SUK to submit the data by March 10."

Kakade said, "The candidates can supervise the exams or help the professors in setting up the question paper. Also, these candidates will have to clear the Board of studies recognition in order to be eligible as a supervisor."



**The results of the winter semester examination could not be declared within the stipulated deadline last year due to the unavailability of the expert faculties**

According to an SUK official, "The exam department of SUK, which is having a crunch of senior supervisors and evaluators, can breathe a sigh of relief after this decision."

Maharashtra Universities Act 1994, did not allow participation of any candidate but only the recognised professors from the affiliated colleges. But the new act is flexible enough to accommodate the CHB teachers and the experienced fellows from the respective fields.

An SUK official said, "The results of the winter semester examination held last year could not be declared within the stipulated deadline due to the unavailability of the expert faculties."

He added, "Another reason for the low number of participation of the faculty members in the exam related work is due to the low honorarium offered for the work. The honorarium offered in SUK needs to be improved to attract good number of faculties in the exam assessment work."

-6 MAR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू इलेव्हन, रामानंदतीर्थ, कृषी, मुंबई विद्यापीठाचा विजय

## विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेत यजमान कुलगुरू इलेव्हनसह नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ, राहुरीच्या महात्मा फुले कृषी व मुंबई विद्यापीठाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर आज मात केली. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर स्पर्धा सुरू आहेत.

कुलगुरू इलेव्हनने गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळविला. कुलगुरू इलेव्हनने २० षटकांत तीन गडी बाद १९७ धावा केल्या. सागर पवारने ९५ धावांची खेळी केली. राजेश कोळीने ३१, तर विश्वनाथ वरुटेने २३ धावा केल्या. गोंडवाना विद्यापीठाकडून अविनाश खांदारेने दोन, तर विजय वंजारीने एक गडी बाद केला. गोंडवाना विद्यापीठाला १७.४ षटकांत १२८ धावा करता आल्या. प्रवीण पहानपेरने १९ व अनिल चव्हाणने १९ धावा केल्या. कुलगुरू इलेव्हनकडून विश्वनाथ वरुटेने तीन, तर सागर पवारने दोन गडी बाद केले.

नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठावर ३२ धावांनी विजय मिळविला. रामानंदतीर्थ विद्यापीठाने २० षटकांत नऊ गडी गमावून १५० धावा केल्या. जयकिसान बागडीने ४१ धावा केल्या. तुकडोजी महाराज विद्यापीठाकडून रितेश पुरकामने तीन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल तुकडोजी महाराज विद्यापीठाला १९.५ षटकांत सर्व बाद ११८ धावा करता आल्या. त्यांच्या दुर्गेशने ४२ धावा केल्या. रामानंदतीर्थ विद्यापीठाकडून गोविंद सोनटक्के व शैलेश खांदारेने प्रत्येकी तीन गडी बाद केले.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला हरवले. फुले विद्यापीठाने २० षटकांत आठ बाद १४२ धावा केल्या. मुकुंद गुंडने ३१, योगेश्वर पाटील २५, तर ज्ञानेश्वर लडकतने नाबाद २५ धावा केल्या. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून रश्मीकांत जाधव व राजेश अवचारे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला १२३ धावा करता आल्या. जितेंद्र पाटीलने ४२, प्रवीण बारी २० व दीपक मोरेने २४ धावांचे योगदान दिले. फुले विद्यापीठाकडून अनिल जवणेने तीन, तर सतपाल गायकवाडने दोन गडी बाद केले.

मुंबई विद्यापीठाने नाशिक विद्यापीठावर ९३ धावांनी विजय नोंदवला. त्यांचे १९७ धावांचे आव्हान नाशिकला पेलवले नाही. मुंबईकडून अत्ताउल्ला खानने ५३, तर विपुल खांदारेने ३६ धावा केल्या. नाशिककडून रामदास गुंबडेने एक गडी बाद केला. नाशिकला १०४ धावांपर्यंत मजल मारता आली. त्यांच्या रामदासने २८ धावा केल्या. मुंबई विद्यापीठाकडून संजय पवारने चार गडी बाद केले.

6 MAR 2017

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर






कोल्हापूर : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित डीवायपी ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमात रविवारी विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश यांनी संवाद साधला. या वेळी हाऊसफुल्ल गर्दीने भरून गेलेले शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्र. (बातमी पान २ वर)

(बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 MAR 2017 पुढारी

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कार्यकारिणी सदस्यपदी प्रा. जाधव

चंदगड (प्रतिनिधी) : हलकर्णी येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे इतिहास विभागाचे प्रा. डॉ. मधुकर विठोबा जाधव यांची कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली. त्यांचे मूळ गाव पंढरपूर असून त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर ६० शोधनिबंध सादर केले आहे. त्यांचे गोपाळराव पाटील, अशोकराव जाधव, संजय पाटील, प्राचार्य डॉ. पी. वाय. निंबाळकर यांनी अभिनंदन केले.



प्रा.मधुकर जाधव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 MAR 2017 पुढारी

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कार्यकारिणी सदस्यपदी प्रा. जाधव

चंदगड (प्रतिनिधी) : हलकर्णी येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे इतिहास विभागाचे प्रा. डॉ. मधुकर विठोबा जाधव यांची कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली. त्यांचे मूळ गाव पंढरपूर असून त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर ६० शोधनिबंध सादर केले आहे. त्यांचे गोपाळराव पाटील, अशोकराव जाधव, संजय पाटील, प्राचार्य डॉ. पी. वाय. निंबाळकर यांनी अभिनंदन केले.



प्रा.मधुकर जाधव

# कुछ किए बिना ही जय

## कृष्ण प्रकाश : हाउसफुल्ल गर्दीच्या साक्षीने 'ऊर्जा

सकाळ माध्यम समूह व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने
संवाद ध्येयवेड्यांशी
ऊर्जा 2017

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : राजुरी स्टीलच्या वतीने लोककला केंद्रात भरवण्यात आलेल्या 'लेक वाचवा' या प्रदर्शनात दीपप्रज्वलन करताना विशेष पोलिस महानिरीक्षक (व्हीआयपी सिक्युरिटी) कृष्ण प्रकाश. या वेळी शेजारी 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, डीवायपी ग्रुपचे ऋतुराज पाटील, 'सकाळ'चे व्यवस्थापक (इव्हेंट) सतीश ठोंबरे, राजुरी स्टीलचे संजय मांगुरे.

कोल्हापूर, ता. ५ : स्वतःमधील टॅलेंटला स्वतःच जाणून घ्या... जे काही ध्येय साध्य करायचे आहे, त्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करा आणि तो प्रत्यक्षात उतरण्यासाठी झपाटल्यासारखे कामाला लागा. कारण 'कुछ किए बिना ही जयजयकार नही होती... कोशिश करने वालों की कभी हार नही होती...' विशेष पोलिस महानिरीक्षक (व्हीआयपी सिक्युरिटी) कृष्ण प्रकाश संवाद साधत होते आणि अधिकारी बनून देशाची इमानेइतबारे सेवा करण्याची आस मनात बाळगून कार्यरत असलेल्या तरुणाईच्या स्वप्नांना नवे पंख लाभत होते.

निमित्त होते, सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित डीवायपी ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या कार्यक्रमाचे. कार्यक्रमातील अखेरचे पुष्प आज कृष्ण प्रकाश यांनी गुंफले. तब्बल दीड तासांच्या संवादातून त्यांनी स्वत्वाच्या शोधापासून ते ॲक्शन प्लॅन कसा असावा, तो कसा राबवावा आणि यशस्वी झाल्यानंतरही माणूसपण कसे जपले पाहिजे, या विषयीच्या मौलिक टिप्स दिल्या.

भगवद्गीता, कुराणापासून आणि शिवछत्रपतींपासून ते नेपोलियन, जगभरातील विविध तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचे विविध दाखले देत कृष्ण प्रकाश यांनी संवाद साधला. संस्कृत वचने, विविध शेर आणि कवितांसह बोधकथांचा सुरेख मिलाफ साधत त्यांनी साधलेला हा संवाद सर्वांनाच भावला. शिवाजी विद्यापीठाचे लोककला केंद्र हा संवाद ऐकण्यासाठी तुडुंब भरून गेले आणि त्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने सकारात्मक ऊर्जेचा झराच येथे अवतरला. कृष्ण प्रकाश म्हणाले, "जो काहीच मनापासून ठरवत नाही, त्याला कधीच काही करता येणार नाही. जे मनापासून करावेसे वाटते, ते पहिल्यांदा ठरवा. दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर ते स्वप्न सत्यात उतरताना प्रत्यक्ष कृतिशील कार्यक्रमही आखा. कारण ही सारी प्रक्रिया यशाकडे घेऊन जाताना महत्त्वाची असते. मी यूपीएससी करणार म्हटल्यानंतर अनेकांकडून 'हा काय करणार' अशी हेटाळणीही झाली; पण त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. एक गोष्ट मात्र अगदी ठरवून केली ती म्हणजे दररोज डायरी लिहायचो. वर्षाच्या सुरवातीलाच त्या डायरीची सुरवातीची पाच-सहा पाने कोरीच ठेवायचो आणि या पानांवर ज्यांनी ज्यांनी हेटाळणी केली, त्यांची ती वाक्ये लिहून ठेवायचो. रात्री आठ ते सकाळी दहा अभ्यास करायचो."

तुम्हाला जे काही करायचे आहे, त्याचा मास्टर प्लॅन तयार करा. प्रत्येक दिवसाचा, प्रत्येक आठवड्याचा, महिन्याचा आणि एकूणच वर्षाचा असा हा प्लॅन असायला हवा. जगभरात

# जयकार नही होती...!

## ी : संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमाची सांगता

### कृष्ण प्रकाश सांगतात...

- नेहमी मोठी स्वप्नं बघा. ती पूर्ण करण्यासाठी सातत्य ठेवा.
- तुम्हाला जे काही करायचे आहे, ते स्वतःच ठरवा. जगाचा विचार करू नका.
- खुळ्यात काढणारे भरपूर भेटतील. त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. स्वप्नाची पूर्तता करा, त्यांना सडेतोड उत्तर द्या.
- यशाची विशिष्ट व्याख्या करता येत नाही. तो एक प्रवास असतो.
- स्वतःला ओळखायला शिका. मग तुम्ही मागे वळून पाहणारच नाही.
- उत्तरपत्रिकेत किती पानं उत्तर लिहायचं, त्यापेक्षा काय आणि कसं लिहायचं, याचा विचार अधिक करा.
- योजनेशिवाय कोणत्याही यशापर्यंत पोचणे अशक्य आहे.
- तुम्ही वारंवार पडलात तरी चालेल; पण पडल्यानंतर लगेच उठून पुन्हा उभा राहतो तोच यशस्वी होतो.
- कितीही मोठे अधिकारी झाला तरी देशप्रेम आणि माणुसकी कदापिही विसरू नका.

केवळ तीन टक्केच माणसे आहेत, की जी रोजचा स्वतःचा प्लॅन लिहून काढतात आणि त्याची अंमलबजावणी करतात. त्यामुळे एकदा ती सवयही लावून घ्या. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यातून सुटका करण्याची योजना आखून फक्त बसून राहिले असते तर काहीच झाले नसते. त्यांनी योजना आखली आणि त्यासाठीचा कृती आराखडा तयार करून तो अंमलात आणल्यानेच ते आग्र्याहून सहीसलामत बाहेर पडू शकले. शिवचरित्रातील असे अनेक प्रसंग जाणीवपूर्वक अभ्यासा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असाच संदेश दिला. पण आपण नेमके उलटे करतो. शिका आणि संघटित व्हा हे दोन्ही टप्पे सोडून देतो आणि थेट संघर्षाकडे वळतो, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. दरम्यान, डी. वाय. पाटील ग्रुपचे ऋतुराज पाटील, मार्व्हलस इंजिनिअर्सचे संग्राम पाटील, राजुरी स्टीलचे संजय मांगुरे, पार्थ फौंडेशनचे उमाकांत वाघमारे आदींची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर यांनी स्वागत केले. मिलिंद कुलकर्णी (पुणे) यांनी सूत्रसंचालन केले.

### फेसबुकवर लाइव्ह प्रक्षेपण

ऊर्जा उपक्रमांतर्गत होणारे सर्व संवाद यंदा 'फेसबुक'वरूनही लाइव्ह अनुभवायला मिळाले. त्याचे सर्वांकडून स्वागतही झाले. www.facebook.com/sakalkolhapur या लिंकवर हेच संवाद पुन्हा ऐकायला मिळतील.

### हॅटस् ऑफ सकाळ...!

सलग तीन वर्षे 'ऊर्जा' उपक्रमात सहभागी होणाऱ्या तरुणाईने सांगता कार्यक्रमात सुरवातीलाच सकाळ माध्यम समूहाचे आभार मानले. 'ऊर्जा' उपक्रमातून आमच्या नवचेतना जागवल्याच. त्याशिवाय यशाने हुरळून न जाता इमानेइतबारे सेवा करणारे अनेक आयडॉल्स आम्हाला भेटले. दहा-पंधरा पुस्तके वाचून ज्या गोष्टी समजणार नाहीत, त्या एकेका संवादातून समजत गेल्या, अशा प्रतिक्रिया त्यांनी आवर्जून व्यक्त केल्या.

### शिव-शाहूंची भूमी..!

कोल्हापूर, सांगली, सातारा ही शिवछत्रपती आणि राजर्षी शाहूंच्या कार्याने पवित्र झालेली पुरोगामी विचारांची भूमी आणि म्हणूनच इथल्या मातीत जन्माला येण्यासाठी भाग्य असावे लागते. दुसरा जन्म असेलच तर मलाही या भूमीत जन्म दे, अशीच प्रार्थना मी करीन, असे सांगून कृष्ण प्रकाश म्हणाले, ''जाणता राजा शिवछत्रपती आणि आधुनिक सामाजिक लोकशाहीचे जनक राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्रे ही साऱ्यांसाठीच प्रेरणादायी आहेत. त्याचा सविस्तर अभ्यास प्रत्येकाने करायलाच हवा.''

### यांचे विशेष सहकार्य

'डीवायपी' ग्रुप प्रस्तुत या कार्यक्रमाचे राजुरी स्टील मुख्य प्रायोजक तर मॉडर्न होमिओपॅथी हेल्थ पार्टनर, मार्व्हलस् इंजिनिअर्स, पार्थ फौंडेशन, लक्ष्मी सेल्स, तनिष्क ज्वेलर्स, सीएमएम ॲरेना सहप्रायोजक होते. युनियन बँक बँकिंग पार्टनर होते.